Competitions conducted under *Marathi Bhasha Sanvardhav Pandharwada*.

# निबंध स्पर्धेमध्ये अपेक्षा जाधव, गौरांगी पाटील ठरली अव्वल

## नूतन मराठा महाविद्यालयात स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण



विजेत्यांना पारितोषिक वितरणप्रसंगी चित्रकार राजू बाविस्कर, उपप्राचार्य डॉ. के. बी. पाटील आदी.

**प्रतिनिधी | जळगाव**

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने नूतन मराठा महाविद्यालयात मराठी विभागातर्फे निबंध, वक्तृत्व, घोषवाक्य, काव्यवाचन, वादविवाद स्पर्धा घेण्यात आल्या. निबंध स्पर्धेत वरिष्ठ महाविद्यालय गटात अपेक्षा जाधव, कनिष्ठ गटात गौरांगी पाटील प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. पारितोषिक वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थान उपप्राचार्य डॉ. के. बी. पाटील यांनी भूषवले. मराठी विभागप्रमुख प्रा. ललिता हिंगोणेकर विचारपीठावर होत्या. प्रमुख अतिथी म्हणून चित्रकार राजू बाविस्कर हे होते. जगात वेगळी ओळख निर्माण करायची असेल तर साहित्य आणि कलेची आवड जोपासली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. प्रा. रत्नाकर कोळी यांनी माहिती दिली.

### स्पर्धेतील पहिले तीन विजेते असे

स्पर्धेमध्ये निबंध वरिष्ठ गट : अपेक्षा जाधव, दाज्या पावरा, दिनेश राजू राठोड, कनिष्ठ गट : गौरांगी पाटील, साक्षी काटे, भूमिका देशमुख. वक्तृत्व : अदिती वाणी, अस्मिता बोरसे, माधवी सोनवणे. काव्यवाचन : ऋषीकेश धनगर, अनुश्री कोळी, प्रेरणा धनगर. घोषवाक्य : दाज्या पावरा, जान्हवी पाटील, नेहा सूर्यवंशी. वादविवाद : रितुषा पुंडे, अदिती वाणी, माधवी सोनवणे हे विजयी झाले.